-

# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील सरपंच व उपसरपंच यांचे थकीत वाढीव मानधन अदा करण्याबाबत

**(१) १७०२ (२४-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सरपंच, उपसरपंच यांना मागील सहा-सात महिन्यापासून नियमित मानधन तसेच मानधन दुप्पट करण्याबाबतच्या दिनांक २४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार गत चार महिन्यांपासून वाढीव मानधन मिळाले नसल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मानधन देण्यास शासनाकडून दिरंगाई होण्यामागील कारणे काय आहेत

(३) असल्यास, राज्यातील सरपंच, उपसरपंच यांना थकीत मानधन व वाढीव मानधन तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०५-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

सदरची बाब निदर्शनास आली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही

(३) संचालक,पंचायतराज कार्यालयामार्फ़त माहे सप्टेंबर, २०२५ पर्यंत दरमहा सरपंच, उपसरपंच मानधनासाठीचा निधी जिल्हा परिषदेला त्यांच्या मागणी प्रमाणे जिल्हा परिषदांना वितरित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिमसह १८ जिल्ह्यातील “आधारकेंद्रा”च्या खासगीकरणाला विरोध होत असल्याबाबत

**(२) १७९३ (२३-०४-२०२५) श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाशिम जिल्ह्यासह १८ जिल्ह्यातील आधारकेंद्र हे शासकीय संस्थेऐवजी खासगी कंपन्यांना देण्याचा शासनाचा प्रस्ताव असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भविष्यात खासगी कंपन्यांना आधार मशीन व डेटा व्यवस्थापनाची जबाबदारी देणे डेटा सुरक्षितेच्या दृष्टीने धोकादायक असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात फेर निर्णय घेऊन सदरील प्रस्ताव मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२५-०६-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

वाशिम जिल्ह्यासह १८ जिल्ह्यांमध्ये सद्य:स्थितीत रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई (भारत सरकारचा उपक्रम) या संस्थेमार्फत आधार नोंदणीचे कामकाज सुरू असून सदरची संस्था ही महिला व बालविकास विभागाच्या EA Code वर आधार नोंदणी एजन्सी म्हणून कामकाज करते. सदरची संस्था ही भारत सरकारचा उपक्रम अंतर्गत कार्यरत संस्था आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण होण्याबाबत

**(३) २२६१ (१८-०६-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई औद्योगिक क्षेत्रातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्या मागील अनेक वर्षापासून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून प्रलंबित ठेवण्यात आल्या असल्याने येथील प्रकल्पग्रस्त कृती समितीने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. सदर प्रलंबित मागण्यांचे निवेदन मा.मुख्यमंत्री, महसूल मंत्री,उद्योग मंत्री, वने मंत्री, मुख्य सचिव, अमुस उद्योग, मुख्य कार्यकारी अधिकारी एमआयडीसी, यांना माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांची प्रकरणे निकाली काढून त्यांना सध्याच्या बाजार भावानुसार भरपाई देण्याता यावी तसेच त्यांना सिडकोच्या नियमानुसार साडेबारा टक्के परतावा देण्यात यावा. सन १९६२ मध्ये ज्या उद्दिष्टासाठी संपादित केलेली जमीन संपादनाच्या मूळ उद्दिष्टासाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी वापरात न आलेली जमीन ३५ वर्ष इतका काल मर्यादा संपुष्टात आल्याने या जमिनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना परत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त जमिनीवर सद्य:स्थितीत येथील शेतकऱ्यांचे गुराचे गोठे, राहती घरे,शेत जमिनी असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रकरणी निकालात काढून या जमिनींवरील असलेले एमआयडीसीचे नाव काढून टाकण्यात यावेत व त्यांच्या जमिनी त्यांना परत मिळाव्यात यासाठी ठाणे, बेलापूर औद्योगिक क्षेत्रासाठी स्वतंत्र शासन निर्णय काढण्याबाबत तसेच महापे येथे राखीव ठेवलेल्या जागेवर कौशल्य विकास व औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यासाठी व अशा अन्य प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२४-०६-२०२६) :** (१) सदरचे निवेदन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास प्राप्त झालेले नाही.
(२) व (३) १९६० च्या दशकात टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील २३३३.२७ हे.आर जमिनीचे भूसंपादन झाले आहे. म.औ.वि. महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार प्रकल्पग्रस्तांना १०० चौ.मी. भूखंडाचे वाटप करण्यात येते. संपादित जमिनीवर म.औ.वि. महामंडळाने टिटिसी औद्योगिक क्षेत्र विकसित केले असून, संपादित जमिनीचा वापर औद्योगिकीकरणाकरीता केलेला आहे. त्यामुळे जमिनी परत करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

संपादित जमिनीच्या निवाड्यामध्ये जमिनीमध्ये असलेल्या गोठे, घरे,विहिरी, झाडे इत्यादीचे मूल्यांकन करुन त्याचा मोबदला समाविष्ठ करुन दिलेला असतो. टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र.पी-१८६, क्षेत्र २२५४ चौ.मी. हा भूखंड कौशल्य विकास केंद्राकरीता प्रस्तावित आहे. त्या व्यतिरिक्त टिटिसी औद्योगिक क्षेत्रात राखीव भूखंड रिक्त नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यात तालुकास्तरीय समितीच नसल्याने निराधारांचे प्रस्ताव मंजूर होत नसल्याबाबत

**(४) ७१६९ (२५-०३-२०२६) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, विधवा परित्यक्ता योजना, दिव्यांग योजना आदी योजनांतील लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करून लाभ देण्यासाठी तालुकास्तरावर समित्या गठीत केल्या जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यात काही तालुके वगळता उर्वरित तालुक्यांमध्ये अद्याप समितीच नसल्याने निराधारांचे प्रस्ताव मंजूर होत नसल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले असून सदर समित्या वेळेत गठीत न होण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये तात्काळ समित्या गठीत करून प्रलंबित प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ (२९-०६-२०२६) :** (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही. विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये याकरीता, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्ट-१, नमुना-दोन मधील मुद्दा क्रमांक ४ नुसार ज्या जिल्ह्यामध्ये अशासकीय समिती गठित नसेल अशा जिल्ह्यात संबंधित जिल्हाधिकारी हे तालुकास्तरावर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती स्थापन करण्यात येते. त्यानुषंगाने संबंधित तालुक्यातील तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील शासकीय समितीद्वारे प्रचलित शासन नियमांनुसार दरमहा लाभार्थी पात्र-अपात्रतेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच शासनाने दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना नव्याने "संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती" गठित करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना शासकीय व निमशासकीय कार्यालयामधील १० लाखांपर्यंतची कामे विना निविदा देण्याबाबत

**(५) ७२०९ (१७-०३-२०२६) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना शासकीय व निमशासकीय कार्यालयांमधील रुपये १० लाखांपर्यंतची कामे विना निविदा देण्याबाबत शासनाने दिनांक २८ ऑगस्ट, २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून, सदर शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लिमिटेड (महानिर्मिती) कडून सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात बेरोजगार सहकारी सेवा संस्थांना कामे मंजूर करण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मधे वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय

(२) असल्यास, महानिर्मितीने सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात किती बेरोजगार सहकारी सेवा संस्थांना कामे मंजूर करण्यात आली आहेत, तसेच त्यांची जिल्हानिहाय संख्या किती आहे,

(३)असल्यास, संबंधित बेरोजगार सहकारी सेवा संस्थांना कामे न दिल्यास, सदर कंपनीविरुध्द शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, महानिर्मिती कंपनीच्या विविध विज निर्मिती केंद्रामध्ये निघणाऱ्या कामांकरीता उच्च प्रतीच्या तांत्रिक कौशल्याची आवश्यकता असते. ज्या बेरोजगार सेवा सहकारी संस्थांकडे सदर तांत्रिक कौशल्य असणारे कामगार आहेत, त्या संस्थांना खुल्या दरपत्रकाद्वारे कामे दिली जावू शकतात.

(२) खुल्या दर पत्रकाद्वारे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात विविध बेरोजगार सहकारी सेवा संस्थांना खालीलप्रमाणे ऊर्जा निर्मिती केंद्र निहाय ३३ कामे देण्यात आली.

१. कोयना जल विद्युत केंद्र - १७
२. नाशिक औष्णिक विद्युत केंद्र - ०८
३. चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्र - ०४
४. कोराडी औष्णिक विद्युत केंद्र - ०३
५. अहिल्यानगर सौर कृषी वाहिनी योजना - ०१
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर शहरात अद्यावत लायब्ररी होणेबाबत

**(६) ७६०२ (२४-०३-२०२६) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील 'शैक्षणिक हब' म्हणून प्रसिध्द असलेल्या खारघर शहरात "मुंबई विद्यापीठाच्या मध्यवर्ती वाचनालयाच्या धर्तीवर अद्यावत लायब्ररी" उभारण्याबाबत सिडको प्रशासनाकडून कार्यवाही केली नसल्याने अनेक विद्यार्थी, अभ्यासू व्यक्तिमत्त्व, प्राध्यापक, संशोधक, डॉक्टर व वकील, वाचन प्रेमी इत्यादी नागरिकांच्या मनात प्रचंड असंतोष निर्माण झाला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांकडून वारंवार मागणी करण्यात येऊनही सदरहू अद्यावत ग्रंथालय उभारण्याबाबत सिडकोप्रशासनामार्फत कार्यवाही सुरु व्हावी याकरीता लायब्ररीच्या बांधकामाला सरुवात होण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-०७-२०२६) :** (१) व (२) "नवनगरविकास प्राधिकरण (NTDA)" या नात्याने सिडको महामंडळाकडून नवी मुंबई प्रकल्पांतर्गत विविध नोडचा नियोजन आराखडा बनवितांना विविध सामाजिक प्रयोजनाचे भूखंड आरेखित करण्यात येतात. सदर सामाजिक प्रयोजनासाठीचे भूखंड सिडको महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार पात्र संस्थेस वाटप करण्यात येतात.

नवी मुंबई, खारघर येथील सेक्टर-४ मध्ये 'ग्रंथालय सांस्कृतिक केंद्र' या संयुक्त वापरासाठी भूखंड आरेखित करण्यात आला आहे. यासंदर्भात पनवेल महानगरपालिकेकडून आर्थिक सुसह्यता व तांत्रिक नियोजनाचा अहवाल मागविण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरु आहे. याव्यतिरिक्त खारघर, सेक्टर-२३ येथे केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या अखत्यारीत 'आर्ट डिस्ट्रिक्ट" प्रकल्पाचे नियोजन सुरु असून सदर प्रकल्पामध्ये वाचनालय विकसित करण्याबाबत चाचपणी सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील खो-खोपटूंना अर्जुन पुरस्कार मिळण्यात निर्माण झालेला वीस टक्के गुणांचा अडसर दूर करण्याबाबत

**(७) ७८२९ (२४-०३-२०२६) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रीडा क्षेत्रातील देशातील सर्वोच्च अर्जुन क्रीडा पुरस्कारासाठी खो-खो खेळातील महाराष्ट्राच्या पात्र खेळाडूना वगळून राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार समितीने एकाही राष्ट्रीय स्पर्धेचे विजेतेपद नसलेल्या राजस्थानच्या निर्मला भाटी यांची शिफारस केल्याबाबत महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेने आक्षेप नोंदविला असून पुरस्कारासाठी शिफारशी जाहीर झाल्यानंतर त्यावर हरकती नोंदविल्या असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) देशाची मान उंचावणाऱ्या आणि सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूना अर्जुन पुरस्काराने गौरविण्यात येते राज्यातील अनेक खो-खो खेळाडूनी विश्वचषक स्पर्धेत मोलाची कामगिरी बजावून देखील राज्यातील पात्र खेळाडूना डावलले गेल्याचे मत राज्यातील खो-खो संघटने व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हा पुरस्कार महाराष्ट्रातील खेळाड्स मिळवण्यासाठी अजूनहो राज्यातील खो-खो पदाधिकारी प्रयत्नशील असून सदरहू पुरस्कार निश्चित करणाऱ्या निकषातील २० टक्के गुण सरस असल्याच्या नियमामुळे राज्यातील खो-खोपटटू अर्जुन पुरस्कारापासून वंचित रहात आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि महाराष्ट्र राज्यातील खो-खोपटूंना अर्जुन पुरस्कार मिळण्यात निर्माण झालेला वीस टक्के गुणांचा अडसर दूर करण्याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२४-०६-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेने माहे डिसेंबर, २०२५ मध्ये केंद्र सरकारच्या अर्जुन पुरस्कार निवड प्रक्रियेवर तक्रार दाखल करुन अधिकृत आक्षेप नोंदविला असल्याचे वर्तमानपत्राद्वारे व संघटनेच्या काही पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या चर्चेतून निदर्शनास आले आहे.
(३) केंद्र शसनाच्या युवा कार्य व खेळ मंत्रालय, क्रीडा विभाग यांच्या दिनांक २९/०९/२०२५ च्या परिपत्रकानुसार अर्जुन पुरस्कार सन २०२५ करीता विहित नियमावली प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यातील निकषानुसार पात्र खेळाडूंना केंद्र शासनामार्फत हा पुरस्कार दिला जातो.
(४) अर्जुन पुरस्कार ही केंद्र शासनाची योजना आहे. राज्याच्या क्रीडा विभागामार्फत केंद्र सरकार आणि भारतीय खेल प्राधिकरण (SAI) यांच्याकडे अधिकृत पत्रव्यवहार करून पाठपुरावा सुरू करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मृत पशुधनाची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्याबाबत

**(८) ७८३२ (१७-०३-२०२६) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पशुधन वाढत असताना दुसरीकडे मृत्यू झालेल्या जनावरांच्या मृतदेहांची विल्हेवाट कशी लावावी, हा प्रश्न उग्र बनत चालला असून मृत पशुधनाची योग्य व शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावली नाही तर त्यामुळे भूजल प्रदूषण, हवेतील दुर्गंधी आणि पर्यायाने मानवी आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रश्नाचे गांभीर्य ओळखून मृत जनावरांच्या विल्हेवाटीसाठी शासनाने ‘कॅरकास युटिलायझेशन प्लांट’ उभारण्याबाबत किंवा इन्सिनरेटर बसवण्याबाबत तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किंवा मोठ्या ग्रामपंचायतींच्या स्तरावर मृत जनावरांसाठी राखीव जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०६-२०२६) :** (१) व (२) पशुधनाच्या शवांची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट व निर्जंतुकीकरण करण्यासाठी केंद्रशासनाने विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात येत आहे. याशिवाय नगरविकास विभागाने दिनांक २५/०४/२०२५ च्या परिपत्रकान्वये सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायत यांना प्राण्यांच्या अंत विधीसाठी त्यांच्या कार्यक्षेत्रातील घण कचरा व्यवस्थापन केंद्राच्या शेजारी जागा व सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले आहेत. पावसाळयात / नैसर्गिक आपत्तीच्या काळात कुक्कुट पक्षी व पशुधनाची काळजी घेणे तसेच मृत पशुधनाची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत दिनांक १८/०३/२०२६ च्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात स्वातंत्र्यपूर्वी स्थापन झालेल्या शाळांना शासनाकडून अनुदान मिळणे बाबत

**(९) १७३९४ (२५-०३-२०२३) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात स्वातंत्र्यपूर्वी स्थापना झालेल्या शाळांना निधी देणेबाबत शासनाने निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्वातंत्र्य पूर्वी स्थापना झालेल्या शाळांना अद्याप कोणतेही अनुदान शासनाने मंजूर केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शाळा इतिहासाचा वारसा जोपासत असल्याने यांना निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्वातंत्र्य पूर्वी स्थापना झालेल्या शाळांना निधी देणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१६-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) स्वातंत्र्यपूर्व काळापासून कार्यरत असलेल्या व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करुन शाळेची गुणवत्ता राखून ठेवणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून अन्य माध्यमाच्या शाळांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने विहित निकष, ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पात्र ठरलेल्या १०० शाळांना प्रत्येकी रुपये

१० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यास दिनांक ०३ मार्च, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. तथापि, सदरचा प्रस्ताव व शासन निर्णय वित्त विभागाची मान्यता नसल्याने दिनांक ०५ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील अभ्युदयनगर व जिजामाता नगर येथील झोपडपटटी पुनर्वसन योजना प्रलंबित असल्याबाबत

**(१०) २१४७६ (०५-०१-२०२४) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अभ्युदय नगर आणि जिजामाता नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजना गेल्या २७ वर्षांपासून रखडलेली असल्याची बाब माहे सप्टेंबर,२०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, तसेच उक्त झोपडपट्टी पुनर्वसन योजना गेल्या २७ वर्षांपासून रखडलेली असल्याने या योजनेतील रहिवाशांनी विकासक बदलण्याची मागणीदेखील केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्प पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०६-२०२६) :** (१) व (२) झोपडपट्टी पुनर्विकास योजनेबाबत विकासकाकडून वेगाने कार्यवाही होत नसल्याने प्रथमत: दिनांक ०७ फेब्रुवारी, २०११ रोजी विनियम १३ (२) अन्वये विकासक बदलण्याची कार्यवाही करण्यात आली. तद्नंतर नविन विकासक मे. शांती ओम रेसिडेन्सी प्रा.लि. यांची नेमणूक दिनांक १० ऑगस्ट, २०११ रोजी करण्यात आली. परंतु सोसायटीच्या वतीने पुनश्चः विकासक रद्द करण्याची मागणी झाल्याने १३ (२) अन्वये दिनांक ०५ ऑगस्ट २०२२ रोजी विकासकाची नेमणूक रद्द करण्याची कार्यवाही करण्यात आली. परंतु शिखर तक्रार निवारण समितीने दिनांक ३० एप्रिल, २०२२ रोजी १३ (२) ची कार्यवाही रद्द करून मे. शांती ओम रेसिडेन्सी प्रा.लि. या मूळ विकासकाला मान्यता दिली. तसेच, विकासकाकडून २७९१ झोपडीधारकांपैकी १५६ झोपड्या निष्कासीत केल्या असून त्यांना दोन वर्षाचे आगाऊ, भाडे व एक वर्षाचे Post dated चेक झो.पु. प्राधिकरणाकडे जमा केलेले आहेत. परंतु विकासकाकडून प्रत्यक्ष जागेवर बांधकाम सुरू न झाल्याने त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम १३ (२) अन्वये कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात महापुरुषांशी निगडीत शाळांना अनुदानापासून वंचित ठेवले असल्याबाबत

**(११) २१७२८ (०५-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या शैक्षणिक दर्जा उन्नत करणाचे योजनेतून महापुरुषांशी निगडीत शाळांना अर्थसहाय देण्यात आले असून कोल्हापूर जिल्ह्यातील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या गावातील शाळेला तसेच

जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील साने गुरुजी यांचेशी निगडीत शाळेला अनुदानापासून वंचित ठेवण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास शासनाने महापुरुषांच्या शाळा विकास यादीत १३ शाळांना १४ कोटी ३० लाख रुपये मंजूर केले, परंतु या यादीत हातकणंगले तालुक्यातील कुंभोज गावातील कर्मवीर भाऊराव पाटील व जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील साने गुरुजी यांचेशी निगडीत शाळेला वगळले असून अनुदान देण्याची मागणी तेथील स्थानिक गावकऱ्यांनी त्याच दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोल्हापूर जिल्ह्यातील कर्मवीर भाऊराव पाटील व जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील साने गुरुजी शाळेला अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२४-०६-२०२६) :** (१), (२) व (३)स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव वर्षा निमित्त तत्कालिन मा.मंत्री (वित्त) यांनी अर्थसंकल्पीय भाषणात महापुरूषाशी संबंधित १० ऐतिहासिक गावातील शाळा विकसित करण्याची घोषणा केली होती. सन्माननीय विधिमंडळ सदस्यांच्या आग्रहाखातर त्यात आणखी ३ शाळांचा समावेश करण्यात आला. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या कार्यक्रमांतर्गत दिनांक ०७/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार १३ ऐतिहासिक गावातील शाळां विकसित करण्यासाठी रुपये १४.३० कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान करण्यात आली. “ स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ” कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागास निधी मंजूर झाला होता.त्यातुन ऐतिहासिक गावांच्या शाळा विकसित करण्याकरीता ‘एकवेळेचे प्रदान’ म्हणून निधी उपलब्ध करून देण्यात आला. या शाळांच्या यादीत कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कुंभोज गावातील शाळेचा उल्लेख नसल्याने सदर शाळेकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाशी सल्लामसलत करून योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सन्मानित दिव्यांग खेळाडूला नोकरी मिळणेबाबत

**(१२) २१९२० (०५-०१-२०२४) श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंतरराष्ट्रीय पातळीवर धनुर्विद्येत भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरावर १८ मेडल पटकावणाऱ्या विदर्भातील श्री.संदीप गवई या दिव्यांग खेळाडूला शासनाने शिवछत्रपती राज्य पुरस्काराने सन्मानित केले असून शासकीय नोकरीत घेण्यासाठी सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान क्रिडा आयुक्तालयाकडून प्रसिध्द झालेल्या यादीत त्यांचे नाव असताना व त्याचे कागदपत्राची पडताळणी देखील झालेली असताना अद्याप त्यांना शासनामध्ये नोकरी देण्यात आली नसल्याचे दिनांक ८ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, नोकरीसंदर्भात मंत्रालयात वारंवार पाठपुरावा करुनही प्रतिसाद न मिळाल्याने अमरावती जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व दिव्यांगजन कल्याण महामंडळाचे विद्यमान मा.अध्यक्ष यांचेसमवेत त्यांनी

मा.मुख्यमंत्री महोदयाची भेट घेऊनही त्यांना अद्याप नोकरी न मिळाल्याने त्यांचेवर चहा व पोहे विकून उपजिवीका करण्याची पाळी आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित श्री.संदीप गवई या दिव्यांग खेळाडूला नोकरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२४-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील उल्लेखनीय कामगिरीनुसार श्री.संदिप गवई यांना दिनांक २६/१२/२०२४ च्या शासन आदेशान्वये क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण), गट-ब पदावर थेट नियुक्ती देण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक ३०/१२/२०२४ रोजी पासून श्री.संदिप गवई हे क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण), गट-ब या पदावर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर येथे कार्यरत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शासकीय तंत्रनिकेतन मध्ये मुद्रांक तंत्रशास्त्र शाखेचा पदवी व पदविका अभ्यासक्रम सुरू करणेबाबत

**(१३) २२०३८ (०५-०१-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सामनगाव रोड वरील शासकीय तंत्रनिकेतन मध्ये मुद्रांक तंत्रशास्त्र शाखेचा पदवी व पदविका अभ्यासक्रम सुरू करण्याची मागणी प्रस्तुत लोकप्रतिनिधी व विविध संघटनेने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक शहरात भारत सरकारचे सिक्युरिटी प्रेस करन्सी नोट प्रेस मेंटिंग प्रेस असे उपक्रम कार्यरत असल्याने सदरील अभ्यासक्रमाचा विद्यार्थ्यांना तसेच शासकीय उपक्रमांनासुद्धा फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१०-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक येथे मुद्रण तंत्रशास्त्र हा नवीन अभ्यासक्रम सुरु करणे या विषयी सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक यांचे स्तरावर त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने नमुद केले आहे की, शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक या संस्थेत सद्य:स्थितीत ११ पदविका अभ्यासक्रम सुरू असून सुमारे ३००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेत उपलब्ध सामायिक सोयी सुविधांमध्ये वसतिगृह (मुले+मुली), कर्मशाळा, ग्रंथालय, क्रीडांगण इत्यादींवर

अतिरिक्त ताण पडत आहे. संस्थेत उपलब्ध ०३ शैक्षणिक इमारती AICTE मानकांनुसार फक्त ०९ तुकड्यांसाठी पुरेसे आहेत. तथापि, संस्थेत सद्य:स्थितीत १४ तुकड्यांचे शैक्षणिक कामकाज सुरू आहे.
या व्यतिरिक्त शासकीय तंत्रनिकेतन नाशिक येथे खालीलप्रमाणे विविध उपक्रम राबविले जातात.
१.महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांच्याव्दारे पुरस्कृत खालील प्रयोगशाळा कार्यरत आहेत.

(अ) सामायिक प्रवेश परीक्षा (CET) संगणक सुसज्ज प्रयोगशाळा

(ब) इंटरनेट ऑफ थिंग्स (IOT) प्रयोगशाळा क).DIGITAL उत्तर पत्रिका मुल्यमापनासाठी संगणक प्रयोगशाळा

२. Robotics and automation प्रयोगशाळा ३. IIT Bombay अंतर्गत E- Yantra प्रयोगशाळा आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांनुसार जागा उपलब्ध नसल्याने सद्य:स्थितीत शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक संस्थेमध्ये मुद्रण तंत्रशास्त्र हा नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याची कार्यवाही करता येत नाही.

---

## मुंबईतील म्हाडाच्या इमारतींमधील २८ हजार कुटुंबीय बेघर होणार असल्याबाबत

**(१४) २२४०२ (०५-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडा (गृहनिर्माण) मुंबई दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाकडून सुमारे ३८८ पुनर्रचित इमारतीसाठी विकास नियंत्रण नियमावलीत ३३ (२४) नियमानुसार या इमारतीचा पुनर्विकास प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होत नसल्याने तसेच म्हाडा (गृहनिर्माण) विभागाकडून दुरुस्तीचा खर्च करण्यास शक्य नसल्यामुळे आणि विकासक पुढे येत नसल्याची बाजू पुढे करून पुनर्विकासाच्या सुमारे ३८८ इमारतीमधील २८ हजार कुटुंबीय बेघर होणार असल्याने म्हाडा कृती समितीने माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या पुनर्रचित इमारतीच्या पुनर्विकास व यासंदर्भात नगरविकास खात्याने जाहीर केलेल्या ३३ (२४) नियमानुसार पुनर्विकास प्रकल्प रहिवाशांच्या हितासाठी राबवून सदरचा पुनर्विकासाचा प्रश्न निकाली काढून शासनाकडून कोणती सकारात्मक भूमिका घेण्यात आली आहे वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, अशा सोसायट्यांना स्वयंपुनर्विकास करतांना निधीचा प्रश्न निर्माण होत असल्यामुळे या सर्वांवर मात करण्यासाठी राज्य सरकारकडून गृहनिर्माण अर्थसाह्य महामंडळाची स्थापना करुन पुनर्विकासासाठी निधीचा आधार देण्याचा निर्णय घेतला होता परंतु महामंडळ शासनाने बंद केले असून महामंडळ बंद करण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी सदरहू ३८८ इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रकल्प राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही /उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०६-२०२६) :** (१) व (२) नगरविकास विभागाने दिनांक ०३/११/२०२३ रोजीच्या अधिसुचना अन्वये विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) मध्ये सुधारणा केल्या असून, या

सुधारित अधिसुचनेनुसार प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक देण्याचे मान्य केले आहे. याबाबत अंतिम अधिसुचना नगरविकास विभागाने दिनांक ०८/१०/२०२४ रोजी निर्गमित केली आहे.
नगरविकास विभागाने उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासामध्ये जे लाभ विकास नियंत्रण नियमावली विनियम ३३(७) अंतर्गत मिळतात ते लाभ म्हाडाने बांधलेल्या पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकासामध्ये मिळण्याकरीता दिनांक १८/०७/२०२५ रोजी अधिसुचना प्रसिध्द केली. सदर अधिसूचनेनुसार विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) अंतर्गत म्हाडाने बांधलेल्या पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकासामध्ये भुखंडांच्या संख्येवर आधारीत अतिरिक्त ५%, ८%, व १५% पुनर्वसन चटई क्षेत्र अनुज्ञेय करण्यात आले आहे.
(३) मुंबईतील गृहनिर्माण संस्थाच्या पुनर्विकासाकरीता गृहनिर्माण अर्थसाह्य महामंडळ स्थापनेबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिनांक १६/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
राज्यातील नोंदणीकृत गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या स्वयंपुनर्विकासाला चालना देण्याकरीता दिनांक २९/०९/२०२५ रोजीच्या शासन निणर्ययान्वये स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.
(४) नगरविकास विभागाने उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासामध्ये जे लाभ विकास नियंत्रण नियमावली विनियम ३३(७) अंतर्गत मिळतात ते लाभ म्हाडाने बांधलेल्या पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकासामध्ये मिळण्याकरीता दिनांक १८/०७/२०२५ रोजी अधिसुचना प्रसिध्द केली.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अनुदानास पात्र ठरण्याकरीता दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयातील दोन निकष लागू करणेबाबत

**(१५) २३०४९ (२२-०७-२०२४) श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवीन २०% अनुदानास पात्र होण्याची शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयानुसार नियमावली दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २४ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयानुसार एकूण ११ निकष दिलेले असून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यापैकी कोणतेही सहा निकष पूर्ण करणे अनिवार्य आहे हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक २४ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयातील ११ निकषांपैकी सहाही निकष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पूर्ण करणे शक्य नाही कारण त्यांचे प्रशिक्षण किंवा निवडणूक ड्युटी इत्यादीसाठी नियुक्ती केली जात नाही तसेच शासन निर्णयातील सहा निकषांची पूर्तता शिक्षकेतर कर्मचारी करत नसल्यामुळे अनुदानापासून वंचित आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिनांक २४ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयानुसार त्यांना लागू असलेले दोन निकष अनिवार्य करून अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१६-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) अशा स्वरुपाचे निवेदन आढळून आलेले नाही. शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १५/११/२०११, दिनांक १६/०७/२०१३, दिनांक ०४/०६/२०१४ व दिनांक १४/०८/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुदानासाठी मुल्यांकनाचे निकष ठरविण्यात आले आहेत. उक्त निकषांनुसार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनुदानासाठी पात्रता निश्चित करण्यात आली आहे.

टप्पा अनुदानाबाबत दिनांक ०६/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुदानासाठी पात्र शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना अनुदान तातडीने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने दिनांक २४/०४/२०२३ रोजी शासन परिपत्रकान्वये आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष सवलत देण्यात आली. कागदपत्रे उपलब्ध नसल्यास दिनांक २४/०४/२०२३ रोजीच्या परिपत्रकात नमूद कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्यानंतर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदानासाठी पात्र ठरविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दिव्यांग हक्क कायदा २०१६ च्या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(१६) २३२८१ (१६-०७-२०२४) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिव्यांग हक्क कायदा २०१६ च्या धोरणाचा एक भाग म्हणून स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सल्लागार मंडळाची गेल्या चार वर्षात बैठक झाली नसल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सल्लागार मंडळातील अशासकीय सदस्यांच्या जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दर सहा महिन्यांनी या सल्लागार मंडळाची एक बैठक होणे अपेक्षित असताना ४ वर्ष इतका कालावधी होऊनही बैठकच झाली नसल्याने दिव्यांगांसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिव्यांगांपर्यंत पोहोचत नसून दिव्यांग हक्क कायद्याच्या हेतूची अंमलबजावणी होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१०-०४-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या दिनांक २१ ऑगस्ट, २०२४, दिनांक १० सप्टेंबर, २०२४ तसेच दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये राज्य सल्लागार मंडळावरील सर्व अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. राज्य सल्लागार मंडळाची बैठक दिनांक दिनांक

२५ मार्च, २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त दिनांक ०९ एप्रिल, २०२५ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आले आहे.

सदर इतिवृत्तातील निर्णयाप्रमाणे दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्याचे संबंधित विभागांना वेळोवेळी निदेश देण्यात आले आहेत. तसेच, दिव्यांग व्यक्तीचे हक्क अधिनियम, २०१६ अनुसार राज्य आयुक्त यांचे अधिकार व कर्तव्ये (दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५), दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणाऱ्या छळ (Abuse), हिंसाचार (Violence) आणि शोषण (Exploitation) यांपासून संरक्षण करणे (दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५) व दिव्यांग आरक्षणांतर्गत राज्यातील सर्व शासकीय / निमशासकीय संस्थांमध्ये विविध पदभरतीसाठी दिव्यांगाचे वैश्विक ओळखपत्र (UDID) अनिवार्य करणे (दिनांक ९ ऑक्टोबर, २०२५) याबाबत शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तसेच, विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक सुरक्षेंतर्गत विवाह प्रोत्साहन योजना (१३ नोव्हेंबर, २०२५), दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता साधनसामग्री (Toolkit) घेण्यासाठी वित्तीय सहाय्य (दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५) या योजनांच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा व वित्तीय सहाय्याच्या रकमेत वाढ या बाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील गुणवत्तापूर्वक खेळाडू अनेक वर्षे शासकीय लाभापासून वंचित असल्याबाबत

**(१७) २३३५३ (२०-०७-२०२४) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एशियन गेम्स २०२३ मध्ये इराणचा पराभव करत सुवर्णपदक मिळविणाऱ्या भारतीय कबड्डी संघातील कर्णधार व खेळाडू यांना अद्यापपर्यंत बक्षिसाची रक्कम मिळाली नसल्याचे तसेच सन २०१९ मध्ये मल्लखांब क्रीडा प्रकारात अर्जुन पुरस्कार विजेती हिमानी उत्तम परब या खेळाडूस तांत्रिक कारणास्तव शासन सेवेत समाविष्ट करण्यात येत नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एशियन गेम्समध्ये पदक मिळालेल्या अन्य राज्यातील खेळाडूंना जवळपास तीन कोटी रुपये प्रोत्साहनपर बक्षीस व शासकीय नोकरी दिली जात असून आपल्या राज्यातील खेळाडूंबाबत शासनाकडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुणवत्तापूर्ण खेळाडूंना थेट शासकीय सेवेत घेण्याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये अनेक भारतीय क्रीडा प्रकारांचा समावेश नसल्याने गुणवत्तापूर्ण खेळाडू विविध सवलती व बक्षिसांपासून वंचित असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात खेळाचे वातावरण निर्माण करण्यासाठी तसेच भारतीय क्रीडा प्रकारामधील राज्यातील गुणवत्तापूर्ण खेळाडूंना व त्यांच्या प्रशिक्षकांना बक्षीस व मानसन्मान देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२४-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

एशियन गेम्स, २०२३ मध्ये भारतीय कबड्डी संघास सुवर्ण पदक प्राप्त केले असून या संघातील महाराष्ट्र राज्यातील ३ खेळाडूंना दिनांक २०/१०/२०२३ च्या शासन निर्णयानुसार प्रत्येकी रुपये ७५.०० लक्ष याप्रमाणे रोख पारितोषिक रक्कम त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

शासन निर्णय दिनांक १०/०४/२०१३ मधील परिशिष्ट- "अ" व "ब" नुसार थेट नियुक्ती करीता खेळ यादी निर्धारित केलेली आहे. सदर यादीमध्ये मल्लखांब या खेळाचा समावेश नसल्यामुळे कु.हिमानी परब ह्या थेट नियुक्तीस पात्र ठरत नाहीत.

(२) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २०/१०/२०२३ अन्वये एशियन गेम्समध्ये वैयक्तिक पदक विजेत्या खेळाडूंना रुपये १.०० कोटी, रुपये ७५.०० लक्ष व रुपये ५०.०० लक्ष व सांघिक स्पर्धेत पदक विजेत्या खेळाडूंना रुपये ७५.०० लक्ष, रुपये ५०.०० लक्ष व रुपये २५.०० लक्ष इतकी रक्कम खेळाडूंना देण्यात येत होती. सद्य:स्थितीत दिनांक ०७/१०/२०२४ व दिनांक १५/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रोख पारितोषिके देण्यात येतात.

शासन निर्णय दिनांक २१/०५/२०११ व दिनांक १०/०४/२०१३ अन्वये १. ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा २. जागतिक क्रीडा स्पर्धा ३.एशियन गेम्स व ४.कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धांमध्ये पदक प्राप्त खेळाडूंना थेट नियुक्तीसाठी पात्र ठरविण्यात आले होते.

(३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत शासन निर्णय दिनांक ०९/०७/२०२४ मधील तरतुदीनुसार ऑलंम्पिक मधील पात्र खेळ व सदर शासन निर्णयासोबतचे परिशिष्ट-१ मधील नमूद स्पर्धेतील पदक प्राप्त खेळाडूंना त्यांच्या क्रीडा अर्हतेनुसार थेट नियुक्ती देण्यात येते.

राष्ट्रीय स्पर्धेतील पदक प्राप्त खेळाडूंना दिनांक १५/१०/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार व आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील खेळाडूंना दिनांक ०७/१०/२०२४ व दिनांक १५/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात येते.

(४) दिनांक ०७/१०/२०२४ व दिनांक १५/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार ऑलिम्पिक, एशियन व कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समाविष्ट असलेले खेळ/क्रीडा प्रकार, त्याचप्रमाणे कबड्डी व खो-खो या देशी खेळातील प्राविण्यप्राप्त खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक यांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्याचे धोरण कार्यान्वित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शाळांना वेतनेतर अनुदान मिळणेबाबत

**(१८) २३५८७ (२२-०७-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २००८ नंतर १०० % अनुदानावर आलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व अंशत: अनुदानित शाळांना वेतनेत्तर अनूदान दिले जात नसल्याचे माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा

त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार १०० % अनुदानित शाळांना समान न्याय तत्वाप्रमाणे अंशत अनुदानित शाळांना सन २०२४-२५ या वर्षाकरीता वेतनेत्तर अनुदान देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-०६-२०२६) :** (१) व (२) शासन निर्णय दिनांक १९/०१/२०१३ व दिनांक २९/०१/२०१४ अन्वये, दिनांक ०१/०४/२००८ रोजी १०० टक्के योजनेतर (Non Plan) योजनेमध्ये वेतन घेणाऱ्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन अनुदानावर असलेल्या शिक्षण विभागांतर्गत राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक /शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सन २००८ या वर्षी पाचव्या वेतन आयोगानुसार ज्या टप्प्यावर अनुदान अनुज्ञेय होते, त्या टप्प्यावरील देय वेतन अनुदानास गोठवून त्याच्या पाच टक्के वेतनेत्तर अनुदान (४ टक्के वेतनेत्तर अनुदान व १ टक्का इमारत भाडे / देखभाल अनुदान) रुपये २६६.८२ कोटीच्या मर्यादेत दिनांक ०१/०४/२०१३ पासून उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात वेतनेत्तर अनुदानाकरीता रुपये २७४.९० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपुर येथील मध्यवर्ती संग्रहालयाच्या दुरुस्तीबाबत

**(१९) २४२७८ (१६-०७-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिव्हील लाईन (नागपुर) येथील अजबबंगला या नावे प्रसिध्द असलेले मध्यवर्ती संग्रहालय दुरुस्ती करण्याचे काम अनेक महिन्यांपासून बंद असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारत हेरिटेज या श्रेणीमध्ये असल्यामुळे या संपूर्ण इमारतीच्या दुरुस्तीसाठी शासनाने किती निधी मंजूर केला आहे तसेच किती दिवसांमध्ये दुरुस्ती करुन हे मध्यवर्ती संग्रहालय सर्वसामान्य जनतेकरीता उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन मध्यवर्ती संग्रहालयाच्या दुरुस्तीचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१८-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

संग्रहालयाची मुख्य वास्तू दुरुस्ती कामानिमित्त बंद ठेवण्यात आली असून संग्रहालयाचा विस्तारित भाग पर्यटकांना बघण्यासाठी खुला आहे.
(२) व (३) शिवशस्त्रशौर्यगाथा या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाच्या अनुषंगाने संग्रहालयाच्या विस्तारीत भागाची दुरुस्ती व विकासकामे करण्यासाठी दिनांक १६/०३/२०२४ रोजीच्या विभागाच्या शासन निर्णयान्वये रुपये ९.९३ कोटी इतक्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर काम पूर्ण करण्यात येऊन संग्रहालयाचा काही भाग हा पर्यटकांकरीता फेब्रुवारी २०२५ पासून प्रदर्शनासाठी खुला करण्यात आला आहे.
मध्यवर्ती संग्रहालयाच्या वास्तूचे जतन-दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याकरीता विहीत पध्दतीने वास्तुविशारद यांची नेमणूक करण्यात आलेली होती, सदर कामाचे अंदाजपत्रक विहीत वेळेत सादर करु शकले नाही त्यामुळे त्यांची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे. सदर कामाकरीता नव्याने वास्तुविशारदाची नियुक्ती करण्यात आली असून संग्रहालयाच्या जतन दुरूस्ती कामाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यातील अनुदानित शाळांना देय असलेल्या वेतनेतर अनुदानाबाबत

**(२०) २४४२२ (०५-०३-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वेतनेतर अनुदानाचे दरवर्षी नियमितपणे तरतूद करण्यात येत असून शाळा संचालन व्यवस्थेकरीता लागणाऱ्या वेतनेतर खर्चाच्या बाबींवर शाळा निहाय अनुदान निर्धारित करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२३-२४ करीता मंजूर तरतूद रुपये २६१०२.२४ लाख आली असून मंजूर तरतूद प्रत्यक्षात किती शाळांना, कशा प्रकारे रक्कम वितरित करण्यात आली आहे तसेच सदर तरतूदी मधून सर्व प्रलंबित देयके अदा करण्यास अपूरी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात सर्व प्रलंबित वेतनेतर अनुदानाची देयके अदा करण्यारिता वाढीव तरतूद करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.
शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १९/०१/२०१३ व दिनांक २९/०१/२०१४ रोजीच्या शासन निर्णयात नमूद निकषांनुसार पात्र शाळांना वेतनेतर अनुदान देण्यात येते.
(२) व (३) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात वेतनेतर अनुदान रुपये १५५१.०६ लक्ष व इमारत भाडे/देखभाल याकरीता रुपये ३८७.७७ लक्ष असा एकूण रुपये १९३८.८३ लक्ष इतका निधी वेतनेतर खर्चासाठी ४०९७ पात्र शाळांना वितरीत करण्यात आला आहे. सदर तरतूद देयके अदा करण्यासाठी अपुरी

होती, तथापि, वितरीत केलेले अनुदान पूर्णपणे खर्च न झाल्याने सन २०२४-२५ मध्ये वाढीव अनुदान मागणी करण्यात आलेली नाही.

सन २०२४-२५ आर्थिक वर्षात वेतनेतर अनुदानाकरीता एकूण रुपये २६९.९९ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.